


# आयुष्य गिरवताना...

## भाग १

श्री संदिप हरिश्चंद्र यादव

ई साहित्य प्रतिष्ठान
www.esahity.com
esahity@gmail.com

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# संदिप हरिश्चंद्र यादव

लिखित

# आयुष्य गिरवताना

# आयुष्य गिरवताना

हे पुस्तक विनामूल्य आहे

पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

संदीप हरिश्चंद्र यादव
sandeepyadav1224. blogspot. com
sandeepyadav1224@gmail. com
पत्ता :  बी-८०४, बालाजी सिंफनी, सुकापूर, न्यू पनवेल,
नवी मुंबई, महाराष्ट्र
9769980856

या पुस्तिकेतील लेखनाचे सर्व हक्क लेखककाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा  त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957.  Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

**प्रस्तावना,**

रोजच्या धकाधकीच्या जीवनात, धावपळीचे आयुष्य जगताना समाधानाचे क्षण आपल्या प्रत्येकाला हवे असतात.

थोडा दृष्टिकोण बदलला तर आपल्या आसपास घडणारे लहानसहान प्रसंग खुप काही शिकवून नवचैतन्य फुलवून जातात. समुद्रकिनारी रंगीबेरंगी दगड, शंख, शिंपले वेचताना अचानक मोती मिळावा तसे रोजच्या जगण्यात काही रुपेरी क्षण हि आपल्या ओंजळीत येतात, या रुपेरी क्षणांच्या सोबतीने आयुष्य समाधानाने जगता आले पाहिजे....

अश्याच वैयक्तिक आयुष्यात घडलेल्या काही रुपेरी क्षणांना या छोट्या ललितलेखामधून मांडण्याचा प्रयत्न केलाय.

विचार करायला लावणारे हे छोटे छोटे रुपेरी क्षण तुमच्या मनाला नक्कीच प्रसन्न करतील....



संदीप हरिश्चंद्र यादव
Blogger sandeepyadav1224. blogspot. com
sandeepyadav1224@gmail. com
पत्ता : बी-८०४, बालाजी सिंफनी, सुकापूर, न्यू पनवेल,
नवी मुंबई, महाराष्ट्र 9769980856

# अर्पणपत्रिका

आयुष्यात यशस्वी होण्याआधी एक माणूस म्हणून जगायला शिकवणारे

इतरांना मदत करून नेहमीच चांगुलपणे वागण्याची शिकवण देणारे,

कौटुंबिक आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव करून देणारे,

माझे वडील **कै. हरिश्चंद्र विठोबा यादव** ह्यांना आदरपूर्वक अर्पण

# अनुक्रमणिका


- " एक उनाड प्रवास "
- " प्रेमाची भूक "
- " सुखाचे कॅलक्युलेटर "
- " माणूस हरवलाय "
- " या जन्मावर या जगण्यावर "
- " बॅलेन्स व्हील्स "
- " अनाहूत स्वागत "

# “ एक उनाड प्रवास.. ”

“मुंबई सेंट्रल स्थानकात आपले स्वागत आहे”, या उदघोषणेनी किती छान वाटले, दिल्ली मुंबई राजधानी एक्सप्रेस पोहचली एकदाची, मायदेशी आल्यासारखे वाटले... ऑफिसचे महत्वाचे पेपर्स घेण्यासाठी ऑफिस बॉय आला होता स्टेशनवर, ६०-६५ वर्षांचा तरुण बॉयच म्हणावा लागेल... साहेब पेपर दयाsss, आणि पुढल्याच क्षणी तो तरुण पेपर घेऊन गर्दीत  दिसेनासा झाला...

लाज वाटली स्वतःचीच, धिक्कार असो या शिक्षणाचा, आणि  मोठेपणाचा... वडिलांच्या वयाच्या माणसाने साहेब बोलावे यासारखा दुसरा अपमान नाही, मुळात संस्कार हे मान्यच करू देत नाहीत...

ओला उबेर पेक्षा आज एसटीने प्रवास केला तर पनवेलपर्यंत... बराच काळ लोटला एसटीने प्रवास करून, सो कॉल्ड हाय फाय झालीये लाईफ आता.....

बघता बघता दापोली बस निघाली, एक पनवेल द्या.. तुम्ही पण पनवेल???

पनवेल नंतर एसटी रिकामी जाण्याची  चिंता त्याच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होती, किती हि निष्ठा त्याची कामावर.... खरंच लाखभर रुपये पगार घेऊनही आपण करतो का आपल्या कंपनीचा इतका विचार??

एव्हाना गाडी कुर्ला नेहरुनगर आगारात पोहचली, गाडी दहा मिनिटे थांबेल एवढे बोलुन कंडक्टर स्वारी पाठमोरी जाताना दिसली.
बघता बघता गाडीत फेरीवाल्यांची जत्रा भरली.. वडा पाव, वेफर्स, गोळ्या, बिस्किट्स, पाणी बाटली, कलिंगssssssड.... एकापेक्षा एक जोरात आवाज येऊ लागले.

एक फेरीवाला फारच काकुळतीला आला होता, साहेब काहीतरी  घ्या हो... शेंगदाणे, चणे, वेफर्स, पॉपकॉर्न... पैसे कमवण्याची त्याची धडपड स्पष्ट दिसत होती.. नकळत खिशात हात गेला....
खरंच किती अवघड आहे गरीबाला साधे १०-२० रुपये  कमावणे....

एव्हाना  गाडी बऱ्यापैकी भरत आली होती, कंडक्टर स्वारीचा चेहरा आता खुलला.. वाशी टोलनाका पार केला तसा ड्रायव्हर आणि  कंडक्टरच्या गप्पा रंगु लागल्या.. गाडी एकदा दापोली आगारात पोहचली की मग जाऊयात राव समुद्रावर, बायकोने सकाळी पाच ला उठून पोळ्या दिल्यात बांधुन.. हानुयात बिचवर बसून राव, आपण पण कधी मजा करायची...
कंडक्टरच्या अनुमोदनाचा लगेच स्वीकार झाला ड्रायवरकडून.





मला नकळत प्रशांत दामलेच्या नाटकाच्या ओळी आठवल्या..
" सुख म्हणजे नक्की काय असते, काय पुण्य केल की ते घरबसल्या मिळते "

बघता बघता कधी पनवेल आले कळलेच नाही, बऱ्याच गोष्टी शिकलो या दोन तासाच्या प्रवासात..
आता कधी एकदा घरी पोहचून  पाखरांना कवेत घेतोय असे झालेय...

स्थळ : मुंबई सेंट्रल बस डेपो
तारीख : ३१-०३-२०१७
वेळ : सकाळ ०९:३०

# “ प्रेमाची भूक ”

आज बहुतेक उशीर होणार ऑफिसला, ड्रायविंग करता करता मनात विचारांचे चक्र फिरत होते मध्येच रेडीओ मिरचीचा जितुराजही कानावर पडत होता, मला तर त्या कर्णकर्कश गाण्यांपेक्षा जितुराजचे बोलणेच जास्त सुखावह करते, कोणी इतके सुंदर, अर्थपूर्ण कसे बोलू शकते तेही कधीही न पाहिलेल्या श्रोत्यांसाठी.. इथे आपल्या माणसांबरोबर बोलतानाही मनातले प्रेम ओठांवर यायला धजावत नाही आजकाल...

टुssss ८:४५ am वेलकम संदिप यादव, हुश्श चला वेळेवर पोहचलो ऑफिसला, नाही म्हणायला आमची पंच मशीन न चुकता मला वेलकम करते.....

आज  काहीतरी चुकल्या चुकल्या सारखे वाटत होते, ऑफिसमध्ये शिरताना माझी नजर तिलाच शोधत होती, नेहमीच्या दोन तीन जागा पाहिल्या, पण ती कुठेच नव्हती. खिन्न मनाने मी माझ्या जागेवर आलो, कामाच्या गडबडीत कसे दोन तास गेले कळलेच नाहीत. पण मनात रुखरुख होतीच, ती न दिसल्याची....

शेवटी न रहावून मी उठलो जागेवरुन आणि खाली आलो तिला भेटायला, ओहो काय आश्चर्यम ती जिन्याजवळच बसली होती, जणु काही माझीच वाट बघत होती. माझ्यावर एक रागीट कटाक्ष टाकून  तिने माझ्यावरील  नजर हटवली. तु नसलास तरी मला काहीही  फरक पडत नाही जणु हेच सुचवले तिच्या नजरेने....

मला कळुन चुकले स्वारी आज भलतीच रागावलीये.
काय ग कशी आहेस? मी आपलं काहीतरी  सुरवात करायची म्हणुन बोललो..
अपेक्षेप्रमाणे काहीही  प्रतिसाद नाही आला.. मी हळुवार प्रेमाने तिच्या पाठीवर हात

फिरवला, थोडेसे गोंजारल्यावर अखेर तिने मौनव्रत सोडले,
मॅsssऊsssss. बरे वाटले ऐकुन...

भुक लागले का ग, मॅssऊss मला उत्तर मिळाले.
ओ एक पारले जी द्या 5 रुपयेवाला, भराभर मी दुकानातून परत आलो तिच्या जवळ, सगळा पुडा तिच्या पुढ्यात मोकळा केला. आणि मी बाजूला जाऊन तिला न्याहाळू लागलो....



२-३ बिस्किटे खाऊन झाल्यावर ती उठून बाजूला जाऊन बसली, मला कळेनाच आता काय झाले, मी जवळ येऊन विचारले, काय झाले गं? भुक नाही का? मॅऊss,

तिने हो म्हटले.
मग खात का नसावी मी विचारात पडलो....
एव्हाना तिच्या डोळ्यांची भाषा समजू लागलो होतो मी, तिच्या डोळ्यात बघताच मला समजले तिला काय हवय माझ्याकडून..

मी एक एक करत सगळी बिस्कीटे माझ्या हाताने तिला भरवली, आता भुक मिटल्याचे समाधान स्पष्ट दिसत होते तिच्या चेहऱ्यावर.....

मी उठून मागे वळणार इतक्यात ती धावत आली आणि माझ्या पायाला अंग घासुन गोल फेऱ्या मारू लागली, जणु काही तिला सांगायच होत पोटातल्या भूके बरोबरच प्रेमाची भूकही मिटली होती आज तिची......
टुन कन उडया मारत ती दिसेनासी झाली, मी अजूनही स्तःब्धपणे एकाच जागेवर उभा होतो.

एवढ्याश्या चिमुकल्या जिवाने आज विचार करायला भाग पाडले, खरंच या आजच्या धकाधकीच्या आयुष्यात आपल्या कुटूंबातल्या, जिवलग व्यक्तींची प्रेमाची भूक भागवायला कुठे कमी तर पडत नाही आहोत ना आपण........

स्थळ : ऑफिस, चांदिवली - मुंबई.
तारीख : ०७-०४-२०१७
वेळ : सकाळ ०८:४५

# " सुखाचे कॅलक्युलेटर "

ओहो!! घडाळ्याचे काटे ८:१५ वर पोहचले, १५ मिनीटे उशीर झाला. फ्लाईट दिल्लीत लॅण्ड व्हायला.

कहा हो, डिपाचर गेट नं ६ पर आ जाओ, जी साहब. आजचा आवाज अनोळखी वाटला.
राजेश भाई कहॉ है? गाडीत बसता बसता मी नवीन ड्रायवर ला विचारले. वो तो एक मेहनेके छूट्टी पर है, ईसलीये तो मै आया हू.

काचेवर पडणारा भुर भुर पाऊस छान अल्हाददायक वाटत होता, एव्हाना गाडीने वसंत विहार सोडले आणि जुजबी ओळखीनंतर आमच्या गप्पांनाही रंग चढू लागला. लगते नही हो आप ५२ साल के मी मिश्कील पणे म्हटले, दोघांचाही संकोच अजून थोडा कमी झाला.

दो बेटे स्कुल मे और बडी बेटी लास्ट ईयर कॉलेज मे है अभी, पूरी फॅमिली गाव में और मे अकेला यहा रेहता हू. त्याला किती बोलू आणि किती नको असे झाले होते, अस वाटते बऱ्याच दिवसांनी कोणासमोर तरी मनमोकळे करतोय तो. मग मी ही थोडी सबुरी घेत माझे संवाद फक्त हं हं आणि अच्छा अच्छा पर्यंत मर्यादित ठेवले.

साल मे एक बार गाव जाकर एक साल की यादे और खुशिया लेकर आता हूं, मेरी तो जिंदगी चली गई गरीबी मे, बस अब बच्चो को पढा लिखाकर बडा करना है.
एव्हाना गाडीने ग्रेटर कैलास मागे सोडले, कितना कमा लेते हो? बोलता बोलता चुकून

माझ्याकडून  विचारले गेले. जाणे दो साहब, आपको छुट लगेगा मे बताऊंगा तो आपको झुठ लागेगा,  मी लगेच म्हटले रेहने दो कुछ् दुसरी बात करते हे....




थोडा वेळ दोघेही शांत होतो,

आपसे क्या छुपाना साहब ८५००/- सॅलरी मिलता है, भगवान की दया से ईस मै भी खुष हू. मी तर एकदम सुन्न झालो, काय बोलावे तेच सुचेना. नकळत मनातल्या मनात मी आकडेमोड करू लागलो गावाकडे फॅमिली ३ मुले आणि हा दिल्लीत.

शिक्षण, आजारपण, घरखर्च.. कसे काय भागत असेल. याचा हिशोब काही माझ्या कॅलक्युलेटर मध्ये बसेना, पण ही स्वारी तर मस्त रिलॅक्स वाटत होती.

विचारांच्या चक्राने अधिक वेग पकडला आता डोकं बधिर होतय की काय असे वाटु लागले........

क्या सोच रहे हो साहब उतरीये घर आ गया आपका, मी खिन्नपणे खाली उतरलो, रस्ता क्रॉस करून मागे पाहिले तर स्वारी मस्त डोळे मिटून सीट मागे करून पहुडली होती.

मनात आले सरळ जाऊन विचारावे त्याला, कस जमत सगळ, कुठल्या कॅलक्युलेटर मध्ये आकडेमोड करतोस.....

आणि जमलेचतर त्याच्याकडुन ते सुखाचे कॅलक्युलेटर घेऊनच यावे !!!!

स्थळ : दिल्ली एअरपोर्ट

तारीख : १९-०६-२०१७

वेळ : सकाळ ०९:१५

# “ माणूस हरवलाय ”

बोला, काय आहे तुमचं, पोलिसाने जवळ जवळ मला दरडाऊन विचारले. साहेब ऑफिसच्या कामासाठी ऑफशोर प्लॅटफॉर्मवर जायचंय, पोलीस क्लीअरन्स सर्टिफिकेट हवय.

पेपर आणलेत का सगळे?

मी मानेनंच हो म्हटल.

थांबा थोडा वेळ, या बाईंच होऊ दे आधी.

आधीच कुतूहल पोलिसांच्या कामाच्या पध्दतीचे, त्यात तिथे दुसरे करण्यासारखे काहीच काम नसल्यामुळे आपसूकच मी त्यांचे निरीक्षण करू लागलो.

साहेब दहा दिवस झाले माझे हे घरी नाही आलेत, हो साहेब माझे बाबा हरवलेत, त्यांचा मोबाईलही लागत नाहीये. १८-२० वर्षाची तरुणी व तिची आई पोलीसांना सांगत होती.
अहो बाई साधा मोबाईल हरवला तरी त्याच दिवशी लोक तक्रार नोंदवतात तुमचा तर माणूस हरवलाय, आधी का नाही तक्रार केली. थांबा मी सांगते असे म्हणुन आईने बोलायला सुरवात केली, साहेब आठवड्याभरात येतो असे सांगून हे गेलेत.

कुठे गेलेत काही सांगितलय का, बहुतेक चेन्नईला गेले असतील, मुंबईचा कोणीतरी मुकादम घेऊन गेलाय पाचशे रुपये रोजंदारीवर.

सहज त्या मुलीकडे पाहिले आणि मी जागचा उडालोच, ती चक्क मोबाईलमध्ये पहात गालातल्या गालात हसत होती. आईने कोपऱ्याने मारताच ती भानावर आली. तीचे बाबा हरवल्याचे दुःख तिच्यापेक्षा जास्त मलाच झाल्यासारखे वाटले.

दारू पितात का? नाही साहेब दारूच त्यांना पिते, काहीही करू शकतात हे दारुसाठी. दारू पाजतो म्हटले तर कोणाबरोबर ही जायला तयार होतात. आधीही असे गेलेत निघुन पण १-२ दिवसात येतात परत. साहेब यावेळी फार भिती वाटतेय, त्यात त्यांचा मोबाईलही बंद आहे.




कामधंदा काय करतात? पोलिसांचा पुढचा प्रश्न. तसं तर काहीच नाही घरीच असतात, मी व मुलगी कामाला जाते यावरच घर चालते आमचे.
बाहेर काय लफडं वगैरे?

हो साहेब आहे एक बाई, तसंच काहीतरी आहे, इतक्या वेळ गप्प असलेली मुलगी बोलली. तसा आईने रागाने मुलीवर एक कटाक्ष टाकला, तस काही नाहीये साहेब त्यांची मैत्रीण आहे ती कधीतरी फोन करते इतकेच. तिच्याकडे पण विचारले तिलाही काही माहित नाहीये.
रेल्वे रूळांवर पाहिलंत का?

नाही  नाही तस काय करायची हिम्मत नाहीये यांची, खुप घाबरट आहेत हे.

हवालदार यांची FIR लिहून  घ्या, पोलिसाने हुकुम सोडला.

माझ्या मनात प्रश्नांचे काहुर माजले....

खरंच रक्ताच्या नात्यांमधला ओलावा कधी इतका कमी होऊ शकतो का?
कोणी दारूच्या इतक्या आहारी कसे जाऊ शकतं?
कोणी बायकोमुलांची जबाबदारी कशी विसरू शकतं?
बाबा हरवल्याच काहीच दुःख होऊ नये त्या मुलीला?
कोणी नवरा हरवल्याचे इतके शांतपणे कसे सांगु शकतं कोणी?
खरंच माणसातली माणुसकी कमी झालीये का?

असे अनेक अनुत्तीर्ण प्रश्न मनात घेऊत मी पोलीस स्टेशनच्या बाहेर पडलो......

स्थळ  : खांदेश्वर पोलिस स्टेशन
तारीख : ०३-०९-२०१७
वेळ   : संध्याकाळ ०४:४५

# " या जन्मावर या जगण्यावर "....

बूट पॉलिश करणार का? करणार ना  साहेब, द्या इकडे...
अग हि चप्पल तु शिव, म्या पॉलिश करतो, चप्पल बायकोकडे देत त्याने मोर्चा माझ्या बुटांकडे वळवला.

रस्त्याच्या कडेला झोपडीवजा त्याचे दुकान, लहानसेच पण आटोपशीर लावलेले. दर्शनी भागात जुने सुस्थितीतील बुट ठेवलेले, विक्रीसाठी असावेत बहुतेक.. वरच्या बाजूला नवीन जोडांचे तोरण लटकत होते. आतमध्ये नवीन चपला, बुटे व्यवस्थीत रचुन ठेवलेली, डाव्या बाजूला पॉलिशच्या डब्या, लेस, ब्रश, दाभण व इतर हत्यारे पहुडलेली....

दोघेही नवरा बायको अगदी मन लावून आपापली कामे करत होती..
किती वर्ष झाली तुमच्या दुकानाला?? संवादाला सुरवात करावी म्हणून मी सहज विचारले.... १४-१५ वर्ष झाली, म्हणजे बघा मी दुकान थाटले तेव्हा हि म्हाडा कॉलनी, हा टॉवर, हा बसस्टॉप आजुबाजुची दुकाने काहीच नव्हत बघा...
किती सुटतात दिवसाचे?
चांगला दिस असेल तर ३००-४०० रुपये मिळतात नाही तर कधी ५०-६० रुपयेही लई झाले..
आयुष्य गेल बघा आमच कष्ट करण्यात, खुप चांगल वाईट दिस पाहिलेत पण म्या अन माझ्या बायकोने कधी हात नाही पसरले कोणासमोर...
समोरच्या म्हाडा कॉलनीकडे बोट दाखवत.. पै न पै साठवुन एक खोली घेतलीये विकत १५ लाखाला, माझी तिन्ही मुल बी चांगली निघाली आता कॉलेजला आहेत...

मग मुलं करतात की नाही काही मदत धंदयात?

ती लाख म्हणतात पन आम्हीच नको बोलतो.. मी आन बायकोने ठरवलेय आपल्या मुलांना नाही चपला शिवायला लावायच्या. भरपुर मेहनत करायची आणि खुप शिकवायचे मुलांना बस्स एकच स्वप्न आहे आमच, मोठा साहेब झालेल पहायचय त्यांना...



बाजुच्याच झोपडीवजा चांभाराच्या दुकानाकडे खुणावत, मी विचारले.. हे पण तुमचेच का?
कसलं काय साहेब, थोड चांगलं चाललेलं बघवतय का कोणाला आणि नातेवाईकांना तर नाहीच नाही...

का हो अस का बोलताय? मी प्रश्नार्थक नजरेने विचारले..

आई वारली म्हणून १५ दिवस गावाला गेलो परत येईपर्यंत माझ्या चुलत भावाने हे जवळच दुकान थाटले..
आम्ही पुष्कळ समजावले इतक्या वर्षाचा धंदा आहे माझा, तु दुसरीकडे टाक दुकान, पण तो ऐकेल तर कुठला वरुन मलाच म्हणतोय नसेल जमत तर तुच जा दुसरीकडे...

आधीच महागाईने कंबर मोडलेय त्यात याने धंदा अर्ध्यावर आणलाय... लाज वाटते अश्यांना नातेवाईक म्हणायला... किती स्वार्थी झालेत सगळे.. अस्सं दुसऱ्याच्या पोटावर पाय देऊन सुखी होता येईल का तुम्हीच सांगा बर.
आता मी पामर यावर काय बोलणार..

एव्हाना बुट पॉलिश करुन झाले होते. मी बूट घालून २० रुपयाची नोट पुढे केली. नको नको साहेब राहू देत पैसे तुम्ही इतक्या आपुलकीने बोललात हीच माझी मजुरी... असे नका करू घ्या पैसे नाहीतर मी परत येणार नाही असा दम भरून बळेच मी पैसे त्याच्या हातात टेकवले आणि निघालो...

आपसूकच आता मला माझ्या समस्या, ताणतणाव क्षुल्लक वाटु लागल्या.. आपल्याला उगाचच वाटत असते आपण खुप कष्ट करतो, खुप दुःखं आहेत आपल्या वाट्याला... मग असाच एखादा अवलिया क्षणात आपल्याला आपण किती नशिबवान आहोत याची जाणीव करून देतो...

मनात अरुण दातेंच्या पंक्ती गुणगुणतच मागे फिरलो..
**" या जन्मावर या जगण्यावर शतदा प्रेम करावे........ "**

स्थळ : संघर्ष नगर, चांदिवली
तारीख : १४-०३-२०१८
वेळ : सकाळी ११:३०

# " बॅलेन्स व्हील्स "

डॅडी या मुलाची सायकल बघाना किती फास्ट चालते आणि खड्डयात पण नाही अडकत, माझी सायकल का नाही अशी चालत? माझ्या पाच वर्षाच्या मुलीचा निरागस प्रश्न !!!

हे बघ यामुळे, मी बोटाने खुणावत म्हटले..
डॅडी हि तर छोटी चाक्. बरोबर, म्हणजेच बॅलन्स व्हील्स.

हे बघ हि चाकं काय करतात तर तुझी सायकल चालताना पडू देत नाही देत पण एक प्रॉब्लेम आहे की,
यामुळे सायकलचा स्पीड कमी होतो आणि ती खाचखळण्यात अडकते.

डॅडी मग हि चाकं काढून टाकुयात का आपण.
नको ग तु अजुन लहान आहेस, त्यापेक्षा चाकं थोडी वर करूयात. म्हणजे तुझी सायकल थोडी जोरात पळेल आणि गरज पडेल तेव्हा हि छोटी चाकं आधार देऊन तुला पडण्यापासुन वाचवतील.
मुलीला माझे म्हणणे पटले.

आम्ही तडक रस्त्यापलीकडील सायकलवाल्याकडे जाऊन छोटी चाकं थोडी वर करून घेतली.
बघ बर आता चालवुन, थोडी घाबरत घाबरतच तिने सायकलला पँडल मारले.. बघता बघता ती एक मोठ्ठा फेरा मारून आली.

डॅssssssडी, wowwwww आता माझी सायकल पण फास्ट चालते आणि खड्यात अडकत पण नाही.

मी अजुन एक राउंड मारून येते...

तिच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पहा विचार करू लागलो.....



आपण पण आयुष्यात असे कित्येक बॅलेन्स व्हिल लावून जगत असतो. सतत कुणाच्यातरी आधाराखाली असतो.

खरंय ना !!! आई, वडिल, बहिण, भाऊ, मित्र परिवार ..... असे बरेच जण.

थोडा बॅलन्स जातोय असे वाटले की लगेच आपण कुणाचातरी खांदा धरतो आधारासाठी...
जणु  या आधाराची सवयच होऊन जाते आपल्याला... तर
इथेच चुकतो आपण आणि मग माझी गाडी का हळू  चाललिये म्हणुन नशिबाला दोष देत बसतो...

थोडी हिम्मत करून  हि आधाराची चाकं जरा वर करून  बघा तर..

लहान सहान पॉब्लेमशी स्वतःच लढायला लागा.. बरेच काही  शिकवून जातील हे लहान सहान प्रॉब्लेम्स, बघा स्वतःच्या हिमतीवर  जगण्याची नशाच काही  और असते..
मोठी दुःख आली की आहेतच की आधाराची चाकं.. थोडी  वर तर केलीयेत, आपसुचक ती टेकतील ती खाली... करतील तुम्हाला मदत लढायला..

तुम्हीही बना आधाराची चाकं जेव्हा त्यांना गरज असेल..
बघा पटतंय का....

डॅsssssडी कसला विचार करताय, चला घरी जाऊयात.....

स्थळ  : घर, बालाजी सिंफनी, सुकापूर, नवीन पनवेल
तारीख : ०७-०६-२०१८
वेळ    : संध्याकाळी ०७:३०

# " अनाहूत स्वागत "

भुरभुर पाऊस पडत होता, पैसे काढण्यासाठी म्हणून गाडी एटीएम समोर थांबवली.

छत्री आणली नसल्याचे खापर बायकोवर फोडून गाडीतून उतरलो. शाब्दिक चकमक नको म्हणून दरवेळी प्रमाणे बायकोने यावेळीही न केलेली चूक मान्य करून मौन राहणे पसंद केले.

कुठेतरी वाचले होते, "90 % of the happiness in your life is depend upon your one decision, to whom you will marry. " या बाबतीत मात्र मी नक्कीच खुप नशीबवान आहे. अगदी मनासारखी व सांभाळून घेणारी सहचारिणी मिळण्याबद्दल. असो कौतुक सोहळा इथेच आटोपता घेतो कारण चार चौघात जास्त कौतुक केले कि बायका फक्त चार चौघातच नवऱ्याशी नीट बोलतात असेही वाचलेले आठवतय मला.

बऱ्याच वेळेला एटीएम टेम्परररी आऊट ऑफ सर्व्हिस या मेसेज चा अनुभव गाठीशी असल्यामुळे, लगबगीने पावले टाकत लांबूनच एटीएम ची स्क्रीन पाहून मशीन चालू आहे कि नाही याचा अंदाज घायचा प्रयत्न केला..

भुरभुरणाऱ्या पावसामुळे काही स्पष्ट दिसत नव्हते पण कोणीतरी मिणमिणत्या नजरेने एटीएमच्या केबिन मधून माझ्याकडे पाहत आहे असे वाटले. जसजसा जवळ जात होतो आतील नजर जास्त स्पष्ट जाणवू लागली.

कोण असेल बरे आत मध्ये आणि माझ्याकडे का असे एकटक पाहत आहेत, काही बोलायचे का त्यांना, चेहरा तर अनोळखी वाटतोय. असे एक ना हजार प्रश्न माझ्या मनात येऊन गेले आता एटीएमच्या काहीच पाऊले दूर होतो मी, न राहून सारखे माझेही लक्ष तिकडेच जात होते....

परत मागे फिरायचाही विचार मनात येऊन गेला.. शेवटी विचारांचे काहूर थोडे शांत करत  मी एटीएम चा दरवाजा उघडला.

"नमस्कारsssss या या  " समोरील ६०-६५ वर्षाची व्यक्ती उभे राहून अत्यंत  अदबीने उद्गारली.. डोळ्यांमध्ये प्रचंड तेज, खूप आश्वासक आणि हसरा चेहरा, सफेद खुंटलेली दाढी, हलाखीच्या परिस्थितीची साक्ष देणारी एकूणच शरीरयष्टी, अगदी नवीन परिपूर्ण सुरक्षा रक्षकाचा  गणवेश  बहुतेक आजच पहिला दिवस वाटावा असा ....

या अनाहूत स्वागताने  मी फारच भारावून गेलो नकळत डोळ्यासमोर विमानात प्रवेश करताना कृत्रिम हास्य करून स्वागत करणाऱ्या  हवाई सुंदऱ्या तरळून गेल्या... त्यांचा समोर यांचे स्वागत जास्त खरेपणाचे आणि नैसर्गिक  वाटले....




नमस्कार, बसा हो तुम्ही मी उत्तरलो आणि एटीएम मशीन कडे वळलो.. पैसे काढता काढता हळूच एक कटाक्ष टाकला तर ते गृहस्थ अत्यंत आत्मीयतेने माझ्याकडे पाहत होते... काही हवंय का यांना, थोडे पैसे देऊ करू का? मी विचार करू लागलो... पण पैसे देऊन मला त्यांचा स्वाभिमान मला दुखावायचा नव्हता....

मी काहीच न बोलता बाहेर पडू लागलो..

इतक्यात मागून आवाज आला " चला, सावकाश जा ".. मी त्यांना हात जोडून नमस्कार केला आणि बाहेर पडलो...

इतका वेळ मी बाहेर येण्याची वाट पाहत असलेला माणूस घाई घाई ने आत गेला..

दरवाजा बंद होता होता पुसटचे शब्द माझ्या कानावर पडले ""नमस्कारsssss या या"...

त्या माणसाचे हि तितक्याच आत्मीयतेने स्वागत, फार छान वाटते  अश्या चांगुलपणा असणाऱ्या व्यक्तींना पाहिले कि...

बहुतेक हि शेवटचीच पिढी असणार असे वागू शकणारी....

आपल्या कर्माला सर्वस्व मानणारी...

इतक्या आपलेपणाने बोलणारी...

कोणत्याही परिस्थितीत सुखी राहणारी.....

दुसरयाच्या मनात सहज घर करणारी.....

सर्वात महत्वाचे एक माणूस म्हणून जगणारी.......

स्थळ  : आयसीआयसीआय एटीएम, सेक्टर -५, नवीन पनवेल

तारीख : ११-०८-१८

वेळ   : सकाळ १०:३०

*आपल्या अभिप्राय व सूचनांचे स्वागत आहे.*

*लवकरच भेटूयात...........*

**आयुष्य गिरवताना...**

***भाग -२ मध्ये....***